प्र. ०. प्रत.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** हिंगोली **P.S.(ठाणे):** कळमनुरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0105 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/02/2025 22:46

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 24/02/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 24/02/2025
   **Time From (वेळेपासून):** 14:28 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 16:03 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 24/02/2025 **Time (वेळ):** 22:33 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 044

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/02/2025 22:33 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** घरकुल विभाग पंचायत समिती , कार्यालय कळमनुरी ,कळमनुरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

10 Total valu (चोरीस गेले

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): कैलास जगदेराव सुर्यवंशी

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1983

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मोरवाडी,कळमनुरी,कळमनुरी,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मोरवाडी,कळमनुरी,कळमनुरी,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय): कष्टकरी

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9421864784

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सागर साहेबराव पवार | | | 1. सहयोग नगर कळमनुरी , कळमनुरी,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | संजय मारोतराव मोरे | | | 1. कामठा ,कळमनुरी ,अखाडा बाळापूर,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली दिनांक :- 24.02.2025 फिर्याद मी, कैलास जगदेराव सुर्यवंशी, वय 42 वर्षे, व्यवसाय रोजमजुरी, रा. मोरवाडी, ता.कळमनुरी, जि.हिंगोली मो. 942186478 समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 24.02.2025 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो हिंगोली येथे श्री विनायक जाधव, पोलीस निरीक्षक, यांचेकडे लेखी तक्रार दिली होती की, मी मौजे मोरवाडी, ता.कळमनुरी येथे राहणारा असुन मजुरी करतो. माझे नावाने मोरवाडी गावात जागा असून घर क्रं. 72 आहे. त्या जागेवर पंचायत समिती कळमनुरी कडून प्रधानमंत्री घरकुल आवास योजना सन 2024-2025 अंतर्गत माझे स्वतःचे नावे घरकुल मंजुर झाले आहे. त्या घरकूलाचे बांधकाम करण्यासाठी मंजूर झालेली 1,20,000/-रू. रक्कमे पैकी पहीला हप्ता 15,000/- माझे बँक खात्यावर जमा झाला असून उर्वरीत एकुण 1,05,000/-रू. रक्कम मिळणे बाकी आहे. त्या रक्कमेपैकी घरकुलाचा दुसरा हप्ता 70,000/-रू. मंजुर असून त्याचा पंचायत समिती कळमनुरी येथे चेक मिळणे बाकी आहे. दि.21.02.2025 रोजी माझे बांधकाम केलेल्या घरकूलाची पाहणी करून मंजुर घरकुलाचा दुसरा हप्ता 70,000/-रू. रक्कम माझे बँक खात्यावर जमा करण्यासाठी मी पंचायत समिती कळमनुरी येथील सागर पवार, कंत्राटी इंजिनिअर यांना जावून भेटलो असता माझे बांधकाम केलेल्या घरकुलची पाहणी करून अहवाल पंचायत समिती कळमनुरी येथील लेखा विभागामध्ये सादर करून घरकुलाचा दुसरा हप्ता बँक खात्यात जमा करण्यासाठी अगोदर 15,000/-रू. लागतील असे सांगून 15,000/-रू लाचेची मागणी केली असुन त्यांनी किंवा त्यांचे मार्फतिने इतर कोणी माझे कामासाठी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही करावी अशी लेखी तक्रार दिली होती.

त्यांनतर पो.नि.श्री.विनायक जाधव ला.प्र.वि हिंगोली यांनी दोन शासकीय पंचाना ला.प्र.वि. कार्यालयात बोलावुन माझा परीचय त्यांना व त्यांचा परीचय मला करून दिला, हजर असलेले दोन पंच नामे श्री सुधाकर विश्नाथअप्पा तांबोळी, कनिष्ठ लिपीक, सहायक संचालक, नगर रचना कार्यालय, हिंगोली व श्री शेख खयुम शेख अमीन, शिपाई, सहायक संचालक, नगर रचना कार्यालय, हिंगोली असे असुन त्यांना मी दिलेली लेखी तक्रार दाखविण्यात आली होती.

त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या संबंधाने दिनांक 24.02.2025 रोजी तक्रार पडताळणी कार्यवाही करण्याकरीता पंच क्र.01 तांबोळी यांचेसह श्री सागर पवार, कंत्राटी इंजिनिअर, पंचायत समीती, कळमनुरी यांची भेट घेण्या करीता कळमनुरी येथील पंचायत समिती येथे गेलो असता श्री सागर पवार, यांची पंचायत समिती कळमनुरी येथील घरकुल विभागामध्ये भेट झाली तेव्हा माझे घरकुलाचा दुसरा हप्ता माझे बँक खात्यावर टाकण्यासंबधी बोलणी केली असता श्री सागर पवार यांनी मला '' काय करा तुम्ही सरळ सरळ पंधरा हजार कॅश आणुन द्या मी तुमचे काम मार्गी लावतो दहा एक दिवसांत तुमचे पैसे पडुन जातील'' असे म्हणुन 15,000/- लाच रक्कम स्विकारण्याची सहमती दिली होती.

त्यावरून दिनांक 24.02.2025 रोजी पो.नि.श्री.विनायक जाधव ला.प्र.वि हिंगोली यांनी कळमनुरी येथील नांदेड रोडवरील नगर पालीकेच्या पाणी फिल्टरच्या पाण्याचे टाकीजवळ सापळा पुर्व कार्यवाही दोन पंचासमक्ष करून दाखविली त्यानंतर मी लाच म्हणून देण्यासाठी आणलेले 15,000/- रू. (ज्यात 500/- रू. चे 30 नोटा) चे नंबर व वर्णन एका कागदावर लिहण्यात आले होते. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री विनायक जाधव यांनी अँन्थ्राँसीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहिती देवून त्याचे प्रात्यक्षिक सपोउपनि शेख महमद शेख युनूस लाप्रवि हिंगोली यांचे करवी करून दाखविले व लाच म्हणून द्यावयाच्या नोटांना दोन्ही बाजुने अँन्थ्राँसीन पावडर लावली व सागर पवार इंजिनिअर यांनी लाच स्विकारल्या नतर उजवे खिशातील पांढरा हातरूमाल काढुन तोंड पुसून हातात धरावा असा ईशारा करावयाचा असल्याचे पोलीस निरीक्षक श्री विनायक जाधव यांनी मला व पंचाना तसेच सापळा पथकातील सर्व सदस्यांना सुचना दिल्यात.



Scanned with OKEN Scanner

त्यानंतर दिनांक 24.02.2024 चे दुपारी 03.48 वा. दरम्यान मी व पंच तसेच सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी असे सागर पवार, इंजिनिअर यांना भेटण्यासाठी पंचायत समीती कार्यालया कळमनुरी कडे रवाना झालो. तेव्हा माझी व सागर पवार यांची पंचायत समीती येथील घरकुल विभागामध्ये भेट झाली. तेव्हा सागर पवार इंजिनिअर यांना मी हाताने इशारा करून आणले असे म्हणालो असता त्यांनी मला '' ठिक हय देवुन टाका......... मोरे कडं '' तेव्हा मी त्यांना म्हणालो दहा देउ का तेव्हा त्यांनी मला पंधरा असे म्हणाले तेव्हा मी माझे पॅन्टचे पाठीमागील बाजुच्या उजव्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम 15,000/-रू. संजय मोरे यांचेकडे दिली असता त्यांनी ती लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारून त्यांचे अंगातील पॅंटचे उजवे बाजुच्या खिशात ठेवली तेव्हा मी घरकुल विभागातुन बाहेर येवुन सापळा पथकास ठरल्या प्रमाणे लाच स्विकाल्याचा ईशारा केला. तेव्हा सापळा पथकाने सागर पवार व संजय मोरे यांना दुपारी 04.03 वा. पंचायत समीती कार्यालयाचे आवारातील घरकुल विभागामध्ये ताब्यात घेवुन संजय मोरे यांच्या पॅंटचे उजवे बाजुच्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम 15,000/-रू. त्याचेकडून पंचासमक्ष जप्त केली. तसेच पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान माझे व आरोपी सागर पवार, इंजिनिअर, संजय मारोतराव मोरे खाजगी व्यक्ती रा. कामठा यांचेशी प्रत्यक्ष भेटी दरम्यान झालेले संभाषण हे व्हाईस रेकॉर्डरद्वारे मेमरी कार्डमधे रेकॉर्ड करण्यात आले आहे.

तरी पंचायत समिती कळमनुरी येथील सागर पवार, इंजिनिअर यांनी माझे बांधकाम केलेल्या घरकुलची पाहणी करून अहवाल पंचायत समिती कळमनुरी येथील लेखा विभागामध्ये सादर करून घरकुलाचा दुसरा हप्ता बॅंक खात्यात जमा करण्यासाठी मला अगोदर 15,000/-रू. लागतील असे सांगून 15,000/-रू लाचेची मागणी करून सदरची लाच रक्कम 15,000/- रू संजय मारोतराव मोरे खाजगी इसम, रा. कामठा, ता.कळमनुरी यांचे मार्फतिने स्विकारली म्हणुन त्यांचे विरूध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी म्हणून मी फिर्याद देत आहे. माझी वरील फिर्याद मी सापळा कार्यवाही झाल्यानंतर ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली येथे आज दिनांक 24.02.2025 रोजी पोलीस निरीक्षक श्री विनायक जाधव यांना तोंडी सांगितली असून ती त्यांनी संगणकावर टंकलिखित केली असून माझे वरील फिर्यादीची प्रिंट काढल्यावर मी माझी फिर्याद वाचून पाहिली असून ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

सही

(विनायक जाधव)
पोलीस निरीक्षक
जि. हिंगोली
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली .

कैलास जगदेवराव सुर्यवंशी
रा.मोरवाडी,ता.कळमनुरी,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): VINAYAK DEVIDASRAO JADHAV
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.): 15101000402VDJ
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** MOHAN BALASAHEB
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 15101000402MBBM82(



Scanned with OKEN Scanner